क्रमांक : १४२८८/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : २० सप्टेंबर, २०२१.

**:: ज्ञापन ::**

या सचिवालयाच्या दैनंदिन कामकाजाकरीता विविध कक्षांकरीता कामकाजनिहाय पदांचा आकृतीबंध निश्चित करण्यात आला असून, त्या आकृतीबंधानुसार अधिकारी / कर्मचारी यांची सेवा संबंधित कक्षांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या सचिवालयाच्या दैनंदिन तसेच अधिवेशनाच्या कामकाजामध्ये वाढ झालेली असल्याने सध्या अस्तित्वात असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांची सेवा अपुरी पडत असल्याची तक्रार विविध कक्षांकडून प्राप्त होत आहे. अधिकारी / कर्मचारी यांची सेवा अपुरी पडत असल्याने अतिरिक्त कर्मचाऱ्यांची सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत वारंवार मागणी करण्यात येत आहे. तथापि, या सचिवालयाच्या कामकाजासाठी उपलब्ध असलेले मनुष्यबळ सिमित स्वरुपात असल्याने निश्चित केलेल्या पदांच्या आकृतीबंधाव्यतिरिक्त अतिरिक्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही.

संसदीय कामकाज व कार्यपध्दतीमध्ये वेळोवेळी बदल झालेले आहेत. तदवतच विविध संसदीय आयुधांमध्ये झालेली वाढ, नव्याने करण्यात आलेल्या व करण्यात येणाऱ्या संसदीय समित्यांसाठी अधिकारी/कर्मचारी वृंद निश्चित करणे, विधानमंडळ सचिवालयाचे नागपूर कार्यालयासाठी कायमस्वरुपी अधिकारी/कर्मचारी निश्चित करणे इत्यांदीसाठी विधानमंडळ सचिवालयाच्या आकृतीबंधाचा सांगोपांग अभ्यास करुन आवश्यकतेनुसार त्यामध्ये फेरबदल/ सुधारणा सुचविण्याच्यादृष्टीने मा.पीठासीन अधिकाऱ्यांच्या निदेशानुसार या सचिवालयातील खालील अधिकाऱ्यांची आकृतीबंध फेररचना समिती स्थापन करण्यात येत आहे. सदरहू समितीमध्ये खालीलप्रमाणे अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम | समितीवरील पद |
|---|---|---|---|
| १) | श्री.राजेन्द्र ग.भागवत | मा.प्रधान सचिव | समिती प्रमुख |
| २) | श्री.अनिल शं.महाजन | विशेष कार्य अधिकारी | समिती सदस्य |

..२/-

\\Misc101\d\E drive\2021\Restructuring Post\आकृतीबंधाची फेररचना\Dnyapan.doc

| | | | |
|---|---|---|---|
| ३) | श्री.ऋतुराज ज.कुडतरकर | उप सचिव | समिती सदस्य |
| ४) | श्री.संतोष ना.पराडकर | अवर सचिव | समिती सदस्य |
| ५) | श्री.सुभाष श्री.नलावडे | अवर सचिव | समिती सदस्य |
| ६) | श्रीमती अलका दे.पराडकर | कक्ष अधिकारी | समिती सदस्य |
| ७) | श्री.अजय अ.सर्वणकर | पध्दती विश्लेषक | समिती सदस्य |

सदरहू समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :-

१) सद्याच्या आकृतीबंधानुसार या सचिवालयातील विविध कक्षातील कामकाजाच्या तुलनेत मंजूर पदांची संख्या पर्याप्त आहे किंवा कसे ?

२) या सचिवालयातील कक्षांच्या कामकाजात सन २०१० पासून किती वाढ झाली आहे किंवा कसे ? हे तपासणे.

३) कामकाजात वाढ झालेली असल्यास, सध्या कार्यरत कर्मचाऱ्यांकडून कामकाज करणे शक्य आहे का ?

४) या सचिवालयाच्या कामकाजाचे झालेले संगणकीकरण पहाता वाढलेल्या कामकाजासाठी अधिक मनुष्यबळाची आवश्यकता भासणार आहे का ?

५) संगणकीकरण झालेल्या कक्षातील कर्मचाऱ्यांचे इतर कक्षात समायोजन करणे शक्य आहे का ?

६) वाढलेले काम विचारात घेता कर्मचारीवृंद अपुरा पडत असल्यास पदांची पर्याप्त संख्या किती असावी ?

७) या सचिवालयातील काही विवक्षित पदे कंत्राटी सेवेने भरणे शक्य आहे का ?

८) विधानमंडळाच्या काही संसदीय समित्या गठित करण्याचे प्रस्तावित असून या समित्यांसाठी आवश्यक अधिकारी / कर्मचारी वृंद निश्चित करणे.

..३/-

९) विधानमंडळ सचिवालयाच्या नागपूर कार्यालयासाठी आवश्यक अधिकारी/कर्मचारी कायमस्वरुपी उपलब्ध करण्याच्यादृष्टीने उपाययोजना करणे.

उपरोक्त प्रमाणे गठीत करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल मा.पीठासीन अधिकारी यांना सादर करतील.

आदेशानुसार,

(सुभाष नलावडे)
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति,

**उपरोक्त सर्व अधिकारी**

**प्रतिलिपी -:**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
२) मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३) दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्षनेते यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
५) या सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
६) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
७) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
८) "क-२" (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
९) निवडनस्ती.